*तिनं त्याला सांगितलं होतं की तिला तिच्या मैत्रिणींबरोबर चिअरलिडिंग समर कॅम्प जॉईन करायचा होता . रजिस्ट्रेशन फॉर्मवर तिला त्याची सही हवी होती आणि फीपण भरायची होती. तो खूप भडकला होता. त्याच्या मुलीनं चिअरलिडिंगसारख्या फालतू प्रकारात  रस घ्यावा हे त्याला अजिबात मान्य नव्हतं. कितीही प्रतिष्ठा द्यायचा प्रयत्न केला तरी असल्या गोष्टीला काय दर्जा असणार आहे? तिनं उन्हाळ्यात बाकी काहीही करण्यात रस दाखवला असता तरी त्याला चाललं असतं- डान्स, एखादं वाद्य, पेंटिंग, एखादी नवीन भाषा, एखादा खेळ…पण चिअरलिडिंग? शी! गावातल्या बाकीच्या भारतीय लोकांच्या मुलांची  एखाद्या चांगल्या, प्रतिष्ठित व्यवसायाच्या , नोकरीच्या दिशेनं वाटचाल चालू आहे तर माझ्या मुलीला काय करायचंय  तर चिअरलिडिंग! आणि तो आत्ता 'हो' म्हणाला आणि न जाणो तिनं मोठं होऊन त्यातच करियर केलं तर? लोकांना काय वाटलं असतं?  त्यानं मुलीच्या आयुष्याला अशी दिशा दिली म्हणून?*

बायको गेल्यानंतर मुलीला अमेरिकेत एकट्यानं वाढवणाऱ्या भारतीय बापामधलं आणि मुलीमधलं वाढतं अंतर त्याला काळजीत पाडतं, कम्युनिटीमधले त्याचे आदर्श असणारे एक ज्येष्ठ गृहस्थ त्याला धीर देतात. पण त्या संध्याकाळी हे सगळंच उलटंपालटं करून टाकणाऱ्या घटना घडतात. वाचा 'अंतर' या कथेत…